# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
# Maharashtra Electricity Regulatory Commission

माहितीचा अधिकार

क्र : मविनिआ/माअअ/26/2017/01673 दि. 15.03.2017

प्रति,
श्री. बाळासाहेब काशिनाथ मोडक,
सर्व्हे नं. 51/2, बी. टी. कवडे रोड,
घोरपडी गांव, पोस्ट - मुढंवा,
पुणे - 411 036.

विषय :- आपला दि. 16.02.2017 रोजीचा माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत अर्ज.

महोदय,

आपला दि. 16.02.2017 रोजीचा माहिती अधिकार अधिनियम, 2005 चे कलम 6 (1) प्रमाणे केलेला अर्ज आयोगाच्या कार्यालयास दि. 17.02.2017 रोजी प्राप्त झालेला आहे. सदर अर्जात आपण उपस्थित केलेल्या माहितीस अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, आपणांस आवश्यक असलेली माहिती खालीलप्रमाणे पुरविण्यात येत आहे.-

| No. | Information Sought | Information Provided |
|---|---|---|
| 1. | सकाळ पुणे वृत्तपत्रामध्ये 12.09.2016 रोजीच्या जाहीरातीमध्ये जे ग्राहक प्रतिनिधीची नेमणूक करण्यात आली ती ज्या परिपत्रकाव्दारे करण्यात आली असेल त्या परिपत्रकाची प्रत. | आयोगाच्या कार्यालयामध्ये उपलब्ध असलेल्या अभिलेख्यानुसार अर्जदारास आवश्यक असलेल्या माहितीचे दस्ताऐवज उपलब्ध आहेत. (या दस्तऐवजामध्ये एकूण 57 + 728 = 785 पृष्ठे आहेत) |
| 2. | विषयांकित बाबतीत नेमणूक केलेल्या ग्राहक प्रतिनिधीची यादी व ज्या कागदपत्राच्या आधारे नेमणूक करण्यात आली त्या कागदपत्राच्या छायांकित प्रत | |

आपणांस आवश्यक असलेली माहिती आयोगाच्या कार्यालयात उपलब्ध असून सदर माहिती आपणांस पुरविणेसाठी माहितीचा अधिकार (फी आणि खर्च विनियमन) नियम, २००५ चे कलम ४ मधील खंड (अ) नुसार खालीलप्रमाणे शुल्क आकारणी करण्यात येत आहे.

| मागणी केलेली माहितीची एकूण पृष्ठे | प्रती पृष्ठ शुल्क रु. | एकूण माहिती शुल्क रु. | टपाल खर्च रु. (माहिती अर्जदार स्वत: घेऊन जाणार असल्यास टपाल खर्च आवश्यक नाही.) | एकूण रु. |
|---|---|---|---|---|
| ७८५ | २ | १५७०/- | अंदाजे रु.३००/- | १८७०/- |
| | | | एकूण रु. | **१८७०/-** |

वरीलप्रमाणे आकारलेले शुल्क आपण महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई या नावाने धनाकर्ष अथवा कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष रोख रक्कम जमा करुन शुल्क भरल्याची पावती/ चलन पुरावा सत्य प्रत या कार्यालयात समक्ष सादर करुन आपणांस हव्या असलेल्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घ्यावेत.

याव्यतिरिक्त आपणांस असेही कळविण्यात येते की, आपणांस कार्यालयातील अभिलेख्यांचे अवलोकन करण्याची मुभा देण्यात येत आहे. कार्यालयातील अभिलेख्यांचे अवलोकन करण्यासाठी कार्यालयात येण्याअगोदर कार्यालयास लेखी कळविण्यात यावे. आपणांस जे दस्ताऐवज हवे आहेत त्याची तपासणी करुन अभिलेख्यांच्या पत्रांची छायांकित प्रती पृष्ठ शुल्क रू.२/- या प्रमाणे शुल्क आकारुन सदर प्रती आपणांस उपलब्ध करून देण्यात येतील.

सदर दिलेली माहितीबद्दल आपले समाधान न झाल्यास आपण प्रथम अपीलीय अधिकारी श्री. अनिलकुमार उके, उपसंचालक (विधी), महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई यांचेकडे सदर पत्र प्राप्त झाल्यापासून 30 दिवसाच्या आत अपीलीय अधिकारी यांचेकडे अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

आपला विश्वासू,

(प्रदिप मोहरे)
जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी